## १४.मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.<br>मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र - पांढरकवडा, गडचिरोली. |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. शासन निर्णय क्र. एसटीसी-१४८२/२९०८/प्र.क्र.९६/का-९, दि. ११ सप्टेंबर १९८७<br>२. शासन निर्णय मोप्रके-१०९५/प्र.क्र.१८५/९५/का-९, दि. १५ फेब्रुवारी १९९७ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | • महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहन चालक संदर्भातील रिक्त पदांचा अनुशेष भरुन निघावा व अवजड वाहन चालक परवानाधारक अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांढरकवडा व गडचिरोली येथे वाहन चालक प्रशिक्षण देण्यात येत आहे.<br>• मोटार वाहन चालक प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना तांत्रिक, अतांत्रिक चालकविषयक बाबीवर सखोल प्रशिक्षण देणे.<br>• तसेच प्रशिक्षणार्थ्याकडुन वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देऊन सराव करण्यात येतो. |
| ०४ | पात्रता/निकष | • उमेदवार अनुसूचित जमातीचा असावा.<br>• वय २३ ते २५ वर्षे. उंची किमान १६३ सें.मी., शिक्षण ७ वी उत्तीर्ण.<br>• उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया वाहनचालकाचे काम करण्यास सक्षम असावा.<br>• अवजड वाहन चालविण्याचा परवाना व कमीत कमी २ वर्षाचा अवजड वाहन चालविण्याचा अनुभव. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | • अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | • अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प उपलब्ध आहे. |
| ०७ | अर्जाची किमंत असल्यास किती | • सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | • अनुसूचित जमातीचा जातीचा दाखला,अवजड वाहन चालविण्याचा परवाना,इतर अनुषंगिक कागदपत्रे |
| ०९ | अपेक्षित कालावधी | • वर्षातून ५० विद्यार्थ्यांच्या २ बॅचेस घेण्यात येतात. |
| १० | योजनेसंबंधी काही तक्रार असल्यास संपर्क करावयाचे कार्यालय | • संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास |